# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (सचिवालय)

**प्रस्तावना :-** विकास योजना नागपूर (सुधारीत)

**{ नगर रचना विभाग }** मौजा - नारी, खसरा क्र. 126(पै), 124(पै), 125(पै), 92 (पै) व 89-93-94-96/1 पैकी, च्या जागेवरील आरक्षण क्र. MN-26 पार्क करीता राखीव असलेल्या 8.1322 हेक्टर जागेपैकी 3.22 हेक्टर (8 एकर) क्षेत्राची जागा STP करीता आरक्षित करणेस्तव महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 37 अन्वये फेरबदल करणेबाबत.

नागपूर शहराची सुधारीत विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 37 (1) अन्वये शासन, अधिसूचना नगर विकास विभाग क्र. टिपीएस-2496-2643- प्र.क्र. 300 (अ)-97 नवी-9, दि. 07 जानेवारी 2000 अन्वये मंजुर झाली असून ती दि. 01 मार्च 2000 पासून अंमलात आली आहे तसेच वगळलेल्या भागाची विकास योजना शासन अधिसूचना, नगर विकास विभाग क्र. टिपीएस-2400-1628-सी.आर.-200-नवि-9, दि. 10.09.2001 अन्वये मंजुर झाली असून ती दि. 21.09.2001 पासून अमंलात आलेली आहे. तसेच शासनाचे नगर विकास विभागाचे अधिसूचना क्र. टिपीएस-2401-885-प्र.क्र.-76/नवि-9, दि. 27.02.2002 अन्वये नागपूर सुधार प्रन्यासच्या क्षेत्रांअंतर्गत सात योजनांचे क्षेत्र वगळून उर्वरीत नागपूर शहराकरीता नागपूर महानगरपालिकेला नियोजन प्राधिकरण म्हणून घोषित केलेले आहे. तथापी शासनाकडील नगर विकास विभागाची अधिसूचना क्र. टिपीएस-2419-1419- प्र.क्र. 154/2019-नवि-9, दि.27.08.2019 अन्वये संपुर्ण क्षेत्राकरीता नागपूर महानगरपालिका नियोजन प्राधिकरण म्हणून घोषित केलेले होते. तद्नंतर शासनाकडील शासन निर्णय क्र. टिपीएस-2419/ प्र.क्र.-154 (भाग-1)/2019-नवि-9, दि 09.04.2021 अन्वये 7 योजनेतील स्मार्ट सिटी अंतर्गत नगर रचना योजनेतील क्षेत्र वगळून पुन्हा त्या क्षेत्राकरीता नागपूर सुधार प्रन्यासला नियोजन प्राधिकरण म्हणून घोषित केलेले आहे.

नागपूर शहराच्या मंजूर विकास योजना सुधारीत मध्ये मौजा - नारी येथील खसरा क्र. 126(पै), 124(पै), 125(पै), 92 (पै) व 89-93-94-96/1 पैकी मधील 8.1322 हेक्टर क्षेत्राची जागा MN-26 पार्ककरीता राखीव असून, उक्त आरक्षणाचे समुचित प्राधिकरण नागपूर सुधार प्रन्यास आहे. सदर आरक्षणाच्या जागेकरीता नागपूर सुधार प्रन्यास नियोजन प्राधिकरण आहे.

सदर जागेवर लोकहिताकरीता महानगरपालिकेमार्फत ४५ MLD STP प्रकल्प राबविण्याकरीता सार्वजनिक आरोग्य अभियांत्रिकी विभागास जागेची आवश्यकता असुन, उक्त आरक्षणाचे नियोजन प्राधिकरण व समुचित प्राधिकरण नागपूर सुधार प्रन्यास असल्याने नागपूर सुधार प्रन्यासने फेरबदल करण्यास्तव ना-हरकत पत्र दिलेले आहे.

नागपूर शहराच्या सुधारीत मंजूर विकास योजनेतील मौजा- नारी, खसरा क्र. 126(पै), 124(पै), 125(पै), 92 (पै) व 89-93-94-96/1 पैकी मधील आरक्षण क्र. MN-26 पार्क करीता राखीव 8.1322 हेक्टर क्षेत्रापैकी 3.2 हेक्टर (8 एकर) क्षेत्राची जागा विकास योजनेच्या भाग नकाशात दर्शविल्यानूसार आरक्षण क्र. MN-26 पार्क चे आरक्षणा मधुन वगळुन “STP” (Sewage

Treatment Plant) करीता राखीव ठेवणे व त्याकरीता नागपूर महानगरपालिका समुचित प्राधिकरण म्हणून करणेबाबत महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल प्रस्ताव प्रस्तावित आहे.

याकरीता प्रशासकीय ठराव पारीत करून सदर फेरबदल प्रस्तावाबाबत संपूर्ण वैधानिक कार्यवाही केल्यांनतर सदर प्रस्ताव शासन मान्यतेकरीता सादर करणे आवश्यक आहे. याकरीता सदर फेरबदलाची सूचना शासन राजपत्रात, दैनिक वर्तमानपत्रात प्रसिध्द करणे त्यावर प्राप्त आक्षेप/हरकतीवर सुनावणी देऊन योग्य निर्णय घेऊन व तदनंतर उक्त प्रस्ताव शासनास मंजूरीस्तव सादर करण्याकरीता मा. आयुक्त महानगरपालिका, नागपूर यांना अधिकार प्रदान करण्याबाबत मंजूरी देण्याचा प्रश्न विचारात घेणे.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :- 78/मनपा/प्रशासक** **दिनांक** :- 26/11/2025

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार उपसंचालक, नगर रचना विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार विकास योजना नागपूर (सुधारीत) मौजा - नारी, खसरा क्र. 126(पै), 124(पै), 125(पै), 92 (पै) व 89-93-94-96/1 पैकी, च्या जागेवरील आरक्षण क्र. MN-26 पार्क करीता राखीव असलेल्या 8.1322 हेक्टर जागेपैकी 3.22 हेक्टर (8 एकर) क्षेत्राची जागा STP करीता आरक्षित करणेस्तव महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 37 अन्वये फेरबदल करणेबाबत.

नागपूर शहराची सुधारीत विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 37 (1) अन्वये शासन, अधिसूचना नगर विकास विभाग क्र. टिपीएस-2496-2643- प्र.क्र. 300 (अ)-97 नवी-9, दि. 07 जानेवारी 2000 अन्वये मंजुर झाली असून ती दि. 01 मार्च 2000 पासून अंमलात आली आहे तसेच वगळलेल्या भागाची विकास योजना शासन अधिसूचना, नगर विकास विभाग क्र. टिपीएस-2400-1628-सी.आर.-200-नवि-9, दि. 10.09.2001 अन्वये मंजुर झाली असून ती दि. 21.09.2001 पासून अमंलात आलेली आहे. तसेच शासनाचे नगर विकास विभागाचे अधिसूचना क्र. टिपीएस-2401-885-प्र.क्र.-76/नवि-9, दि. 27.02.2002 अन्वये नागपूर सुधार प्रन्यासच्या क्षेत्रांअंतर्गत सात योजनांचे क्षेत्र वगळून उर्वरीत नागपूर शहराकरीता नागपूर महानगरपालिकेला नियोजन प्राधिकरण म्हणून घोषित केलेले आहे. तथापी शासनाकडील नगर विकास विभागाची अधिसूचना क्र. टिपीएस-2419-1419- प्र.क्र. 154/2019-नवि-9, दि.27.08.2019 अन्वये संपुर्ण क्षेत्राकरीता नागपूर महानगरपालिका नियोजन प्राधिकरण म्हणून घोषित केलेले होते. तद्नंतर शासनाकडील शासन निर्णय क्र. टिपीएस-2419/ प्र.क्र.-154 (भाग-1)/2019-नवि-9, दि 09.04.2021 अन्वये 7 योजनेतील स्मार्ट सिटी अंतर्गत नगर रचना योजनेतील क्षेत्र वगळून पुन्हा त्या क्षेत्राकरीता नागपूर सुधार प्रन्यासला नियोजन प्राधिकरण म्हणून घोषित केलेले आहे.

नागपूर शहराच्या मंजूर विकास योजना सुधारीत मध्ये मौजा - नारी येथील खसरा क्र. 126(पै), 124(पै), 125(पै), 92 (पै) व 89-93-94-96/1 पैकी मधील 8.1322 हेक्टर क्षेत्राची जागा MN-26 पार्ककरीता राखीव असून, उक्त आरक्षणाचे समुचित प्राधिकरण नागपूर सुधार प्रन्यास आहे. सदर आरक्षणाच्या जागेकरीता नागपूर सुधार प्रन्यास नियोजन प्राधिकरण आहे.

सदर जागेवर लोकहिताकरीता महानगरपालिकेमार्फत ४५ MLD STP प्रकल्प राबविण्याकरीता सार्वजनिक आरोग्य अभियांत्रिकी विभागास जागेची आवश्यकता असुन, उक्त आरक्षणाचे नियोजन प्राधिकरण व समुचित प्राधिकरण नागपूर सुधार प्रन्यास असल्याने नागपूर सुधार प्रन्यासने फेरबदल करण्यास्तव ना-हरकत पत्र दिलेले आहे.

नागपूर शहराच्या सुधारीत मंजूर विकास योजनेतील मौजा- नारी, खसरा क्र. 126(पै), 124(पै), 125(पै), 92 (पै) व 89-93-94-96/1 पैकी मधील आरक्षण क्र. MN-26 पार्क करीता राखीव 8.1322 हेक्टर क्षेत्रापैकी 3.2 हेक्टर (8 एकर) क्षेत्राची जागा विकास योजनेच्या भाग नकाशात दर्शविल्यानूसार आरक्षण क्र. MN-26 पार्क चे आरक्षणा मधुन वगळुन “STP” (Sewage Treatment Plant) करीता राखीव ठेवणे व त्याकरीता नागपूर महानगरपालिका समुचित प्राधिकरण म्हणून करणेबाबत महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल प्रस्ताव प्रस्तावित आहे.

याकरीता प्रशासकीय ठराव पारीत करून सदर फेरबदल प्रस्तावाबाबत संपूर्ण वैधानिक कार्यवाही केल्यांनतर सदर प्रस्ताव शासन मान्यतेकरीता सादर करणे आवश्यक आहे. याकरीता सदर फेरबदलाची सूचना शासन राजपत्रात, दैनिक वर्तमानपत्रात प्रसिध्द करणे त्यावर प्राप्त आक्षेप/हरकतीवर सुनावणी देऊन योग्य निर्णय घेऊन व तदनंतर उक्त प्रस्ताव शासनास मंजूरीस्तव सादर करण्याकरीता मा. आयुक्त महानगरपालिका, नागपूर यांना अधिकार प्रदान करण्याबाबत मंजूरी देण्याच्या प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मान्यता प्रदान केली.